# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय,
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २९४** **दिनांक :- २०/१०/२०२१**

## अवैध गावठी दारु विक्री करणा-या महिलेवर कारवाई करुन ३२२ लिटर हातभट्टीची दारु जप्त- अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मिरा-भाईंदर यांची कारवाई.

दिनांक १८/१०/२०२१ रोजी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, नालासोपारा (पुर्व), आचोळे रोड येथील बाबुलपाडा या ठिकाणी एक महिला गावठी हातभट्टीची दारु विक्री करीता साठवणुक करुन ठेवुन परिसरात विक्री करीत असते.

सदर मिळालेल्या बातमीचा आशय वरिष्ठांना कळवुन त्यांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे छापा कारवाई करण्यात आली. सदर कारवाईचे दरम्यान महिलेच्या बाबुलपाडा येथील घरातुन १६२ लिटर गावठी हातभट्टीची दारु जप्त करण्यात आली असुन तिचे दुसरे घरातून १६० लिटर गावठी हातभट्टीची दारु असा एकुण १,१२,७००/-रु. किंमतीचा गावठी हातभट्टीचा दारुचा साठा तसेच ईतर मुद्देमाल असा एकुण १,१७,५४५/-रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन नमुद महिलेविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे आचोळे पोलीस ठाणे गुन्हा नोंदक्र. ।। ३४/२०२१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास आचोळे पोलीस ठाण्याकडून चालू आहे.

सदरची कारवाई श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक, श्री. देवीदास हंडोरे, सहा. पोलीस निरीक्षक विलास कुटे, पो.हवा. धनाजी इंगळे, पोना. पवन पाटील, पोशि. अजय यादव, विष्णुदेव घरबुडे, मपोशि. सुनिता अवताडे यांनी केली आहे.